महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाच्या जमिनी शासकीय/ निमशासकीय संस्था, महानगरपालिका, नगरपरिषद, नगरपंचायती व ग्रामपंचायती यांना सार्वजनिक प्रयोजनार्थ सदर जमिनीचे प्रचलित बाजारमूल्य दर तक्त्यानुसार (रेडी रेकनर दरानुसार) होणारे मूल्यांकन आकारुन प्रदान करणेबाबत...

**महाराष्ट्र शासन**

**महसूल व वन विभाग**

**शासन निर्णय क्रमांक : मशेम-२०२४/प्र.क्र.११/ल-७**

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड

मंत्रालय, मुंबई ४०००३२

दिनांक : १० एप्रिल, २०२६

**संदर्भ:-** १.महसूल व वन विभाग, शासन परिपत्रक क्र. मशेम-२०२०/प्र.क्र.५०/ल-७, दि.०८.०२.२०२४

२. महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र. मशेम-२०२४/प्र.क्र.११/ल-७, दि.१३.०३.२०२४

**प्रस्तावना :-**

महाराष्ट्र शेत जमीन (ज.धा.क.म) (सुधारणा) अधिनियम, २०२३ अन्वये महाराष्ट्र शेतजमीन (ज.धा.क.म.) अधिनियम, १९६१ च्या कलम २८-१ अअ मधील (३अ) मध्ये केलेल्या सुधारणेच्या अनुषंगाने संदर्भीय क्र. १ च्या शासन परिपत्रकान्वये महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ याच्या कलम २ च्या खंड (१०) मध्ये व्याख्या केलेल्या गावठाणाच्या किंवा गावाच्या स्थळाच्या हद्दीपासून ५ कि.मी. हद्दीमधील महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाची जमीन ग्रामपंचायतींना गावठाण विस्तार, शासकीय घरकुल योजना, घनकचरा व्यवस्थापन आणि पाणी पुरवठा या सार्वजनिक प्रयोजनाकरीता मागणी करणे अनुज्ञेय राहिल याबाबत मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

०२. उपरोक्त तरतुदीनुसार महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाच्या जमिनी ज्या ग्रामपंचायत क्षेत्रामध्ये आहेत. अशा ग्रामपंचायतीकडून उक्त शासन परिपत्रकामध्ये नमूद सार्वजनिक प्रयोजनार्थ जमीन मागणीचे शासनास प्राप्त होणा-या प्रस्तावांची वारंवारता, महाराष्ट्र शेत जमीन (जमीन धारणेची कमाल मर्यादा) अधिनियम, १९६१ च्या कलम २८-१ अअ मधील पोटकलम ३अ मधील तरतूद, स्थानिक स्वराज्यसंस्थाचे मर्यादित आर्थिक स्त्रोत विचारात घेऊन याबाबत निर्णय घेण्याबाबत विभागाने मा. मंत्रिमंडळासमोर सादर केलेल्या प्रस्तावावर दि.११.०३.२०२४ रोजी झालेल्या मा.मंत्रिमंडळ बैठकीमध्ये घेतलेल्या निर्णयानुसार महाराष्ट्र शेत जमीन (जमीन धारणेची कमाल मर्यादा) अधिनियम, १९६१ च्या कलम २८-१ अअ च्या पोटकलम ३अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाची जमीन नगरपालिका/ नगरपरिषद यांना सार्वजनिक प्रयोजनार्थ व ग्रामपंचायतींना संदर्भीय क्र.१ च्या शासन परिपत्रकामध्ये नमूद सार्वजनिक प्रयोजनांकरिता विनामुल्य प्रदान करण्याबाबत संदर्भीय क्र. २ दि.१३.०३.२०२४ रोजी शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेली आहे. तथापि, सदर शासन निर्णयातील तरतुदीनुसार महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाच्या जमिनी ज्या ग्रामपंचायत क्षेत्रामध्ये आहेत, अशा ग्रामपंचायतींकडून सार्वजनिक प्रयोजनार्थ

विनामूल्य जमीन मागणीच्या मोठ्या प्रमाणात प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांची वारंवारता व उपरोक्त तरतुदीनुसार महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाच्या जमिनी विनामुल्य प्रदान केल्याने शेती महामंडळाकडील जमिनीचे क्षेत्र कमी झाल्याने शेती महामंडळाचा उत्पन्नाचा स्त्रोतही कमी होत असल्याची बाब लक्षात घेता, संदर्भाधीन क्र. २ चा शासन निर्णय अधिक्रमित करुन महाराष्ट्र शेत जमीन (जमीन धारणेची कमाल मर्यादा) अधिनियम, १९६१ च्या कलम २८-१ अअ मधील पोटकलम ३अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाची जमीन शासकीय, निमशासकीय संस्था, महानगरपालिका, नगरपरिषद, नगर पंचायती किंवा ग्रामपंचायती यांना सार्वजनिक प्रयोजनाकरीता सदर जमिनीचे प्रचलित बाजारमुल्य दर तक्त्यानुसार (रेडी रेकनर दरानुसार) होणारे मूल्यांकन आकारून प्रदान करण्याबाबत मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय :-</u>**

महाराष्ट्र शेत जमीन (जमीन धारणेची कमाल मर्यादा) अधिनियम, १९६१ च्या कलम २८-१ अअ मधील पोटकलम ३अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाची जमीन शासकीय, निमशासकीय संस्था, महानगरपालिका, नगरपरिषद, नगर पंचायती किंवा ग्रामपंचायती यांना अनुज्ञेय सार्वजनिक प्रयोजनार्थ शासन मान्यतेने सदर जमिनीचे प्रचलित बाजारमुल्य दर तक्त्यानुसार (रेडी रेकनर दरानुसार) होणारे मूल्यांकन आकारून प्रदान करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०४१०१५३१२६७४१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SATYANARAYAN SHIVPRASAD BAJAJ

Digitally signed by SATYANARAYAN SHIVPRASAD BAJAJ
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT,
2.5.4.20=559498df564ab1121a356349085c1b8e3cc0f12569ba0f7f2090386d4dccb333, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=F7145AF5949FB706E2DCB06C2B209B58FFA369F6E085E02041722C90F0528791, cn=SATYANARAYAN SHIVPRASAD BAJAJ
Date: 2026.04.10 15:34:13 +05'30'

**(सत्यनारायण बजाज)**
**सहसचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत:-**

१) मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
२) मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरीषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
३) मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
४) मा. उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
५) मा. उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
६) सर्व सन्माननीय विधानसभा, विधानपरिषद व संसद सदस्य, मंत्रालय, मुंबई.
७) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई-
८) मा. उप मुख्यमंत्री (नगर विकास व गृहनिर्माण) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
९) मा. उप मुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क, क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्याक कल्याण आणि औकाफ)यांचे उप सचिव, मंत्रालय, मुंबई.

१०) सर्व अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव / सचिव, मंत्रालय, मुंबई.

११) प्रधान सचिव, विधानमंडळ सचिवालय, विधान मवन, मुंबई.

१२) सर्व विभागीय आयुक्त.

१३ ) सर्व जिल्हाधिकारी.

१४) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ, पुणे

१५) सर्व मा. मंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

१६) मा. मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.

१७) महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखापरिक्षा/लेखा अनुज्ञेयता), नागपूर

१८) निवडनस्ती कार्यासन (ल-७), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२